महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- ५५१/२२८
दि:- २५/१/१६

## बैठकीचे इतिवृत्त

मा. महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली एच.सी.एम.टी.आर.प्रकल्पा बाबत दि. ३०/१२/२०१५ रोजी स.११.०० वा. महापालिका आयुक्त कार्यालय येथे बैठक आयोजित करणेत आली होती.

सदर बैठकीमध्ये खालील अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी/पदाधिकारी यांचे नाव | खात्याचे नाव |
|---|---|---|
| १. | श्री. ओमप्रकाश बकोरिया | अति. महापालिका आयुक्त (वि) |
| २. | श्री. आबा बागुल | उप महापौर, पुणे महानगरपालिका |
| ३. | श्री. प्रशांत वाघमारे | शहर अभियंता |
| ४. | श्री. युवराज देशमुख | अधिक्षक अभियंता ( पथ विभाग) |
| ५. | श्री. अनिरुध्द पावसकर | कार्यकारी अभियंता (बांधकाम विकास विभाग) |
| ६. | श्री. सतीश कुलकर्णी | उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग |
| ७. | श्री. दिनेश गिराला | उप अभियंता/नियोजन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय |
| ८. | श्री.सुहास नलावडे | उप अभियंता, मालमत्ता व्यवस्थापन विभाग |
| ९. | श्री. एकनाथ गाडेकर | उप अभियंता ( पथ विभाग) |
| १०. | श्री. पुरुषोत्तम भुतडा | प्र. उप अभियंता, उप आयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग |

सदर बैठकीत खालीलप्रमाणे चर्चा होवून निर्णय घेणेत आले.

| अ.क्र. | झालेली चर्चा व घेणेत आलेले निर्णय | संबंधीत खाते |
|---|---|---|
| १ | एच.सी.एम.टी.आर. रस्त्यासाठी लागणारे एकुण क्षेत्र ६८.०३ हेक्टर इतके आहे. यामध्ये सरकारी जमिनी व खाजगी जागांचा समावेश आहे. एच.सी.एम.टी.आर. प्रकल्प इलिव्हेटेड तसेच काही ठिकाणी रस्त्यांवरून देखील करता येवू शकतो. यासाठी डी.पी.आर.करणे आवश्यक आहे. | मुख्य अभियंता, पथ विभाग |
| २ | महानगरपालिकेच्या ताब्यात १४. ०७ हेक्टर क्षेत्र असून खाजगी क्षेत्र २५.४९ हेक्टर व शासकीय जमिनीचे क्षेत्र २८.४७ हेक्टर इतके आहे. शासकीय जागांमध्ये वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, येरवडा जेल, पुणे विदयापीठ, एस आर पी.एफ., जलसंपदा विभाग व संरक्षण विभाग यांचा समावेश आहे. कारागृह व इतर शासकीय विभागांकडून जागा ताब्यात देण्याबाबत नकार देण्यात आला आहे. जलसंपदा विभागाने कॅनॉलच्या जागेवर आपण काय करणार आहे याची माहिती मागितली आहे. (इलिव्हेटेड रस्ता करणार आहेत की ॲट ग्रेड त्याचा डि.पी.आर. सादर करणेबाबत) रस्त्यातील जागा | मुख्य अभियंता, पथ विभाग<br>उप आयुक्त,<br>भूसंपादन व व्यवस्थापन विभाग |

| | | |
|---|---|---|
| ३ | एच.सी.एम.टी. आर. मध्ये काही ठिकाणी रिअलाईनमेंट करावी लागणार आहे. सध्याच्या डि.पी. मध्ये त्याचा समावेश केलला नसल्याने सदर रिअलाईनमेंटचा प्रस्ताव मे.राज्य शासनाकडे स्वतंत्रपणे दाखल करावा. | शहर अभियंता |
| ४ | एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाचा आराखडा (डिपीआर) तयार करून घेणेबाबत चर्चा झाली. एच.सी.एम.टी.आर. रस्त्यासाठी सल्लागार नेमणेची कार्यवाही सुरू करणेचे आदेश देणेत आले. | पथ विभाग |
| ५ | एच.सी.एम.टी.आर. रस्त्यासाठीच्या टी.डी.आर.ची पॉलीसी लवकरच पूर्ण होणार असून त्यासाठी आपल्याला स्वतंत्र टि.डी.आर. कक्षाची स्थापना करावी लागेल. तसेच प्रकल्पासाठी शासनाकडील अभियंत्याची स्वतंत्र नेमणूक आवश्यक असून शासनाकडील अधिकाऱ्याची नेमणूक करून त्यांच्यामार्फत ३ वर्षामध्ये हा प्रकल्प पूर्ण करता येईल. शहर अभियंता यांनी टि.डी.आर. सेल ची कार्यवाही लवकरात लवकर करावी. | शहर अभियंता |

(कुणाल कुमार)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

प्रतः-

१. मा. उप महापौर, पुणे महानगरपालिका
२. शहर अभियंता
३. अधिक्षक अभियंता ( पथ विभाग)
४. कार्यकारी अभियंता (बांधकाम विकास विभाग)
५. उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग
६. उप आयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

प्रतिलिपीः-
अति. महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी सादर ....